# केलदि चेन्नम्मा

शान्तादेवी मालवाड

9323

म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. 9323



BVBK-0401323

वाच. वा. वा.
9323
६७१८२

पुष्प १६

# केळदी चेन्नम्मा

लेखक
**शांतादेवी माळवाड**

अनुवादक
**मधुकर हुद्दार**

मुख्य सम्पादक
एल. एस. शेषगिरि

BVBK-0401323

भारत-भारती [मराठी संस्करण]
हईकर पथ, नागपूर-२

प्रकाशक
भारत-भारती [मराठी संस्करण] बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपुरकर
मंत्री
श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती
रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

सम्पादक, मराठी संस्करण
सुरेश दत्तात्रेय देशपांडे

पहिली आवृत्ती, जुलै १९८१

मूल्य रु. २-००

मुद्रक
वि. भि. धाक्रस
नाग मुद्रणालय, रुईकर पथ, नागपूर-२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्रोत. त्यांच्या जीवनातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे' ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटया-छोटया पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती' ने या चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित

करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी सार्‍यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपणासही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

संपादक

शाखा.
९३२३ दि ६।७।८२

# केळदी चेन्नम्मा

चेन्नम्मा ही केळदी या पुरातन राज्याची राणी. विधवा असूनही राज्याभोवती असलेल्या अनेक शत्रूंशी तिनं धैर्यानं लढा दिला व अनेक संकटांपासून आपल्या प्रजेचं रक्षण केलं.

त्या वेळी मोगल बादशहा औरंगजेब दिल्लीच्या तक्तावर होता. तो स्वत:ला आलमगीर ही पदवी लावी. सर्व जगाला जिंकणारा तो आलमगीर! उत्तरेत त्यानं अनेक राज्यं जिंकली होती आणि आता त्याची नजर दक्षिणेकडे वळली होती. त्याची राज्यविस्ताराची तहान अजूनही शमली नव्हती. त्याचं प्रचंड आणि बलाढ्य सैन्य कर्नाटकातील या लहानशा केळदी राज्यावर चालून आलं. राणीनं शिवाजी महाराजांच्या पुत्राला आश्रय देण्याचा गुन्हा केला, हे या आक्रमणाचं कारण सांगण्यात आलं.

पण राणीनं धैर्य सोडलं नाही. ती भ्यालीही नाही आणि आपल्या कृतीचा तिला पश्चात्तापही

झाला नाही. दयेची भीक न मागता वीरांगनेप्रमाणे ती लढली. अखेर शत्रूनं आपलं सैन्य मागे घेऊन तहाची याचना केली. त्यावेळीही ती अतिशय उदारपणे वागली. हीच थोर आणि वीर राणी केळदी चेन्नम्मा या नावानं इतिहासात प्रसिद्ध आहे.

कर्नाटकाच्या मलनाड प्रदेशातील केळदी या राज्यावर तिनं पंचवीस वर्षं राज्य केलं. मोत्याचं तेज असलेला गौरवर्ण तिला लाभला होता. तिचे डोळे टपोरे आणि ललाट भव्य होतं. घनदाट कुरळे केस आणि धारदार नाक यामुळं तिचं राजबिंडं व्यक्तिमत्त्व अधिकच शोभून दिसे. रूपासोबतच विविध गुणांची संपदाही तिला लाभली होती. दुर्गादेवीप्रमाणं शत्रूंचा नि:पात करण्याचं सामर्थ्य तिच्यात होतं. सौंदर्य, शौर्य, करुणा आणि उदारता या साऱ्यांचा विलक्षण समन्वय तिच्या ठिकाणी झाला होता.

## असामान्य राजा

केळदी हे कर्नाटकाच्या मलनाड प्रदेशातील राज्य. चौडप्पनायक हा केळदीचा पहिला राजा.

इ. स. १५०० मध्ये तो सिंहासनावर आला. एक प्रजावत्सल पराक्रमी राजा, असा लौकिक त्यानं मिळवला.

पुढे इ. स. १६४५ मध्ये शिवप्पनायक हा समर्थ राजा राज्यावर आला. त्याच्या कारकीर्दीत केळदीत अनेक सुधारणा झाल्या. राज्यप्रशासनाला त्यानं शिस्त लावली. शेतसारा, करवसुली यांच्या सुयोग्य पद्धती त्यानं आखल्या. त्यामुळे प्रजा त्याला 'शिस्तिनशिवप्पनायक' (शिस्त व सुव्य-वस्थेचा भोक्ता) या नावानं संबोधू लागली. इ. स. १६६४ मध्ये त्याचा धाकटा मुलगा सोमेश्वरनायक गादीवर आला. या वेळपर्यंत केळदीचं राज्य गोवा ते मलबार या संपूर्ण समुद्रकिनाऱ्यापर्यंत पसरलं होतं

सोमेश्वरनायक हा कर्तृत्वसंपन्न राजा होता. तो जसा देखणा तसाच धनवान आणि बलवानही होता. त्याच्यात अनेक चांगले गुण होते. सोमेश्वर सर्वस्वी वैभवात रमणारा नव्हता. तो धार्मिक वृत्तीचा होता. राजकारण संपलं की तो देवाधर्मात

आपला वेळ घालवी. शांत, सोज्ज्वळ, न्यायी, प्रेमळ व संयमी असा तो होता.

अनेक वर्षे त्यानं विवाह केला नाही. तरुण, देखणा, सद्‌गुणी आणि शूर असल्यामुळं साहजिकच अनेक राजांनी त्याला आपला जावई करून घेण्याचा प्रयत्न करून पाहिला; पण व्यर्थ. त्यानं अनेक राजकन्या पाहिल्या. परंतु लग्नाचा मोह त्याला पडला नाही. त्याची धार्मिक वृत्ती आणि परमेश्वरावरील श्रद्धा पाहून आपला राजा संन्यासी तर होणार नाही ना, अशी शंका प्रजेच्या मनात सतत डोकावू लागली.

## 'हीच माझी वधू'

असेच दिवस जात होते. ऋतुचक्रे फिरत होती. एक दिवस राजा सोमेश्वर रामेश्वरच्या यात्रेला गेला. तेथे एक लावण्यवती तरुणी त्याला दिसली. चेन्नम्मा तिचं नाव. कोटीपुऱ्याच्या सिद्धप्प-शेट्टीची ती मुलगी. एखाद्या कोरीव शिल्पाप्रमाणे ती रेखीव हाती. आपल्या सख्यांसोबत ती मंदिरा-कडे मोठ्या रुबाबात चालली होती. सोमेश्वर-

नायकानं तिला पुन्हा पुन्हा पाहिलं. अन् तो स्वत:शीच म्हणाला, "जर मला लग्न करायचंच झालं, तर मी हिच्याशीच करणार!"

सोमेश्वरानं आपले दूत धाडले. चौकशी केली. कुणाची मुलगी? कूळ काय? सारं जाणून घेतलं. दुसऱ्याच दिवशी त्यानं आपल्या मुख्य मंत्र्याला बोलावलं आणि सांगितलं, "तुम्ही मला लग्न करण्याचा आग्रह करीत होता, होय ना? मग ऐका तर! काल मी रामेश्वरच्या जत्रेत कोटीपुऱ्याच्या सिद्धप्पशेट्टीची मुलगी पाहिली आहे. मी लग्न करीन तर तिच्याशीच. सिद्धप्पाला निरोप धाडा अन् बोलणी करा." मुख्य मंत्री हे ऐकून क्षणभर थांवले आणि म्हणाले, "महाराज, क्षमा करा. पण केळदीच्या सर्व राजांनी आता-पर्यंत फक्त राजकन्यांशीच लग्न लावण्याची प्रथा पाळलेली आहे. तेव्हा आपण....." सोमेश्वर निश्चयाच्या स्वरात म्हणाला, "असेल, पण मला एकच गोष्ट माहीत आहे. आपल्याला जे पटतं, योग्य वाटतं ते करायचं. अन्य कोणत्याही प्रथेशी मला कर्तव्य नाही. मी याच मुलीशी विवाह

करणार." "जशी आज्ञा महाराज. हा मी निघालोच शेट्टीकडे," मुख्य मंत्र्यानं वाकून अभिवादन करीत म्हटलं. तो लगेच सिद्धप्पशेट्टीच्या घराकडे निघाला. त्याच्याही पुढं धावत होतं चेन्नम्माचं भाग्य !

मंत्र्याला दाराशी पाहून सिद्धप्पा बुचकळ्यात पडला. भांबावला. घाबरला. पण क्षणभरच. मंत्र्यानं सिद्धप्पाला म्हटलं, "राजाला तुमच्या मुलीशी, चेन्नम्माशी विवाह करायचा आहे." सिद्धप्पाचा आपल्या कानावर प्रथम विश्वासच वसेना. काय, ऐकतोय् काय मी हे ? माझी चेन्नम्मा सोमेश्वरराजाची राणी होणार ! धुळीतलं हे रत्न राजसिंहासनाला जडणार !! अखेर आनंदानं त्यानं होकार दिला. त्यानं चेन्नम्माला आत जाऊन सांगितलं. आपल्याशी राजा लग्न करू इच्छितो, हे ऐकून तिलाही आश्चर्य वाटलं. पण त्याबरोबरच तिचं हृदय आश्चर्य आणि आनंद यांनी तुडुंब भरून आलं.

मुहूर्त ठरला. बिदनूरच्या राजवाड्यात सनई-

चौघडे वाजू लागले. देवब्राह्मणांच्या साक्षीनं चेन्नम्मा केवळ केळदीच्या राजसिंहासनाचीच नव्हे तर सोमेश्वराच्या हृदयाचीही राणी झाली. नव-परिणित राजाराणीनं आपल्या कुलदैवतांची म्हणजे रामेश्वराची, इक्केरीच्या अघोरेश्वराची आणि कोल्लूरच्या मूकांबिकेची यथासांग पूजा केली. गोरगरीबांना आणि गरजूंना दानधर्म केला.

सोमेश्वर-चेन्नम्माचं वैवाहिक जीवन दुग्ध-शर्करायोगाप्रमाणे गोड नि सुखासमाधानाचं होतं. त्यांनी परस्परांना पूर्णपणे जाणून घेतलं होतं आणि त्यांचं परस्परांवर निस्सीम प्रेम होतं. चेन्नम्मा बुद्धिमान होती. थोड्याच अवधीत तिनं राजकारण व राज्यशासन यात प्रावीण्य संपादन केलं; शस्त्रकौशल्य शिकून घेतलं. संगीत आत्मसात केलं व साहित्यातील अभिरुची ही वाढविली.

राणी चेन्नम्मा आपल्या राज्यातील प्रजेची व राजवाड्यातील सेवकांची स्वतःच्या मुलांप्रमाणे अपार वात्सल्यानं काळजी घेई. चेन्नम्मा सोमे-

श्वराची केवळ पत्नीच नव्हती तर सल्लागारही होती. अतिशय विश्वासातील मंत्र्याप्रमाणे राज्य-कारभारात प्रसंगी ती सोमेश्वराला मोलाचा सल्ला देई. अन्यायाला बळी पडलेले व राजाकडे जायला घाबरणारे प्रजाजन तिच्याकडे जात. मग ती आपल्या पतीशी बोलून त्यांना न्याय मिळवून देई. सज्जनांना संरक्षण व दुष्टांना शासन देण्यासाठी ती राजाला प्रेरणा देई. त्यामुळे चेन्नम्मा ही देवता आहे, प्रजावत्सल राजमाता आहे असंच साऱ्यांना वाटे. प्रजेच्या मनात तिच्याविषयी अपार आदर व गाढ श्रद्धा होती. विशुद्ध न्यायव्यवस्था व सर्व धर्मांना समान वागणूक हे या दांपत्याचं धोरण होतं. मठ व अन्य धार्मिक संस्था यांना त्यांच्याकडून मोठमोठ्या जमिनींचं दान मिळे.

विजयनगरची एक महान परंपराही त्यांनी कटाक्षानं जोपासली होती. दसऱ्याचा उत्सव विजयनगरचे राजे राष्ट्रीय उत्सव म्हणून राज-शाही थाटाने साजरा करीत. या 'नाडहब्बा'च्या दिवसात देशाच्या काऱ्याकोपरातून अनेक कलावंत केळदीला येत व आपल्या कलेचे प्रदर्शन करीत.

नृत्य आणि संगीत यांचा कार्यक्रम झाल्यानंतर राजा सोमेश्वर आणि राणी चेन्नम्मा कलावंतांना मौल्यवान देणग्यांच्या रूपाने विदागी देत.

## कलावतीचा शाप

एका दसऱ्याच्या उत्सवात जमखिंडीची प्रसिद्ध नृत्यांगना कलावती हिनं आपलं नृत्य राजदांपत्यासमोर सादर केलं. राजा प्रसन्न झाला. कलावती नृत्यकुशल होती. तशीच अप्रतीम सुंदरही होती. कळत नकळत तिनं सोमेश्वराच्या हृदयाच्या कोपऱ्यात एक जागा मिळविली. राजानं खुष होऊन तिला भरपूर धनदौलत दिली व राजनर्तकी होण्याचा बहुमानही दिला. कोकिळेचा गोड आवाज नि मयूराचं नृत्य या गुणांनी पुढं कलावतीनं सोमेश्वरावर चांगलीच मोहिनी घातली.

सोमेश्वरानं कलावतीच्या निवासाची खास व्यवस्था करविली. ती आपली आई अन् मानलेला पिता भरमेमावुत यांसह दरबारी नर्तकीच्या थाटात राहू लागली. भरमेमावुताला जादुटोणा नि गुप्त औषधी यांचं ज्ञान होतं. चेन्नम्माला

मूलबाळ नाही असं पाहून त्यानं सोमेश्वराशी दृढ मैत्री संपादन केली. भरमेचा कावेबाजपणा अंकूर धरू लागला. त्यानं यथावकाश सोमेश्वराला पूर्ण वश केलं. हळुहळू राजा कलावतीच्या वाड्यात राहू लागला. तो भरमेमावुताच्या हातातील कळसूत्री बाहुलं बनला. आपल्या लाडक्या प्रियेला, चेन्नम्माला तो पूर्ण विसरला आणि राजवाड्यात येईनासा झाला. भरमेमावुताने त्याला औषध म्हणून दिलेलं काहीही तो खाऊन टाकी. परिणामत: राजा भ्रमिष्टासारखा झाला. अनेक व्याधी त्याच्या शरीरात घर करू लागल्या. चेन्नम्मा हे सारं हताशपणे पाहत होती. मंत्री आणि अन्य अधिकारी यांनाही आता कलावतीच्या वाड्यात जाऊन राज्यासंबंधी सल्ला घ्यावा लागे.

एके काळी आपल्यावर इतक्या उत्कटतेनं प्रेम करणारा आपला पती आता राजवाड्यात पायही ठेवीत नाही, हे पाहून चेन्नम्माला अतिशय दु:ख होई. तिच्या डोळ्यांचं पाणी खळेना. आपल्याला आदर्श राजा मिळाला, हे आपलं सद्‌भाग्य आहे या भावनेनं एके काळी

सारी प्रजा स्वत:ला धन्य मानीत असे. पण आज त्याच राजाच्या मनात आपल्या राज्याविषयी यत्किंचितही विचार नव्हता. राजाच्या या उदासीन वृत्तीमुळे राज्यात अराजकाला सुरुवात झाली. सर्वदूर त्याच्या आजारपणाची वार्ता पसरली. राजाला मूलबाळ नव्हतं. अचानक त्याचा मृत्य झाला तर ?

अशा परिस्थितीत साहजिकच अनेकजणांनी सिंहासन बळकाविण्यासाठी कट शिजविण्यास प्रारंभ केला. केळदीच्या राजाकडून अनेकदा पराभूत झालेला विजापूरचा सुलतानही राज्यावर चाल करून आला.

**'स्वामी, परत या'**

चिंतेनं चेन्नम्माला अंतर्बाह्य ग्रासलं होतं. परंतु आपल्या वडिलधाऱ्यांनी जोपासलेल्या व आपल्या स्वाधीन केलेल्या या राज्याचं संकटां-पासून रक्षण करण्याचा तिनं ठाम निर्धार केला. आपण अबला आहोत, या विचारानं ती निष्क्रिय राहिली असती तर राज्य नक्कीच गेलं असतं.

तिनं सारा स्वाभिमान आणि प्रतिष्ठा बाजूला ठेवली आणि राजाला भेटण्याकरिता नर्तिकेचाही उंबरठा ओलांडला.

राजा रोगानं जर्जर झाला होता. त्याचा कृश नि निस्तेज देह म्हणजे पूर्वीच्या आरोग्य-संपन्न सौष्ठवपूर्ण सोमेश्वराची केवळ छाया होती. चेहऱ्यावरचं पाणी पार लोपलं होतं. डोळे निस्तेज झाले होते. त्याला पाहून तिचं हृदय गलवलून आलं. ती अतीव कष्टी झाली. फुटू पाहणाऱ्या अश्रूंचा बांध सावरीत ती आपल्या पतीला कळवळून म्हणाली, "महाराज, काय ही आपली दशा ! आपण राजवाड्यात परत चला. राजवैद्य आपल्याला लवकरच बरं करतील. शिवप्पनायकाच्या या महान राज्याचा विनाश होता कामा नये. आपण स्वेच्छेनं कुणाही योग्य बालकाला दत्तक घ्या. पण परत चला, स्वामी, परत चला." राजाच्या पाया पडून तिनं विनवणी केली.

पण राज्यावरील साऱ्या अरिष्टांचं मूळ असलेला भरमेमावुत तिथंच होता. त्याच्या शब्दाला




" चला, स्वामी, परत चला. शिवप्पनायकाच्या राज्याचा विनाश होता कामा नये ! "

भुलून राजानं चेन्नम्माच्या विनंतीला नकार दिला. " छे, मला ते जमणार नाही. चेन्नम्मा तू परत जा," राजा म्हणाला—अगदी भावनाशून्य स्वरात !

चेन्नम्मा निराश होऊन परतली. पण आता रडायला, दु:ख करायलाही तिला वेळ नव्हता. कारण शत्रूनं राज्याला केव्हाच वेढा घातला होता.

**कोमल हाती राज्यशासन**

राजवंश वाचवायचा असेल आणि राज्य टिकवून ठेवायचं असेल तर हाती तलवार घेणं आणि राज्यशासन चालविणं ही दोन्ही कामं आता आपण स्वत:च केली पाहिजेत असा राणीनं विचार केला. परमेश्वरावर श्रद्धा ठेवून चेन्नम्मानं राज्याचा अवजड भार आपल्या नाजुक खांद्यावर घेतला. तिनं आपले वडील सिद्धप्पशेट्टी आणि विश्वासू सरदार यांच्याशी सल्लामसलत केली. कंकणांनी विभूषित असलेले कोमल हात आता तलवार परजू लागले.

उद्दाम शत्रूंनी विचार केला, " कितीही झालं तरी ही एक स्त्री आहे. तिला घाबरविणं मुळीच

कठीण नाही." आणि तिला धमकावण्यास त्यांनी सुरुवात केली.

एक दिवस मुख्यमंत्री कासरगोडचा तिमण्ण-नायक कृष्णप्पा सबनीसासह तिच्याकडे गेला आणि म्हणाला, " राणीसाहेब, सरसेनापती भद्रप्पनायकाच्या मुलाला, वीरभद्राला आपण दत्तक घ्यावं. असं झालं तरच आम्ही आपणास सहकार्य देऊ. अन्यथा, सर्व लोकांना तुमच्याविरुद्ध संघटित करून त्याला आम्ही आपला राजा बनवू."

नरसप्पैय्या आणि लक्ष्मैय्या या अन्य मंत्र्यांनीसुद्धा अशीच धमकी तिला दिली होती.

चेन्नम्मानं सारं शांतपणानं ऐकून घेतलं. एकीकडे भरमेमावुत सोमेश्वराला ताब्यात घेऊन राज्यहरण करायला अधीर झाला होता, तर दुसरीकडे सारे मंत्री आणि इतर महत्त्वाची माणसं आपल्या मर्जीतल्या माणसाला सिंहासनावर आणून आपलं स्थान कायम करण्याच्या तयारीत होते. पण चेन्नम्मा डगमगली नाही. तिनं कुणालाही भीक घातली नाही. तिला मूल नव्हतं. त्यामुळे एखाद्या

सद्‌गुणी, राज्यकल्याणाचा अग्रदूत ठरेल अशा मुलाला दत्तक घेण्याचं तिनं ठरविलं. वसप्पनायक नावाच्या मुलाची तिनं निवड केली. राज्य टिकून राहावं आणि लोक सुखी व्हावे याकरिता त्याला योग्य प्रकारचं प्रशिक्षण देण्याचंही तिनं ठरविलं.

## संकटांची परंपरा

विजापूरचा सुलतान केळदीचा घास गिळायला टपलेलाच होता. केळदीचा राजा निष्काळजी झाला असून रोगग्रस्त आहे आणि राज्यही स्त्रीच्या हाती आहे हे त्याला कळलं. त्याच्या मनात मोह निर्माण झाला. संधी आपल्याला बोलवीत आहे असं त्याला वाटलं. त्यानं आपला प्रतिनिधी म्हणून जन्नोपंताला चेन्नम्मा राणीकडे वाटाघाटीसाठी पाठविलं. जन्नोपंताच्या पाठोपाठच सुलतानानं मुजफ्फरखानाच्या सेनापतित्वाखाली प्रचंड सैन्य केळदीकडे रवाना केलं.

जन्नोपंत राणीला भेटले. राणीला गुप्त हेरांकडून सुलतानाच्या कारस्थानाची सर्व माहिती आधीच कळली होती. परंतु ती वेळ युद्ध

करण्याची नव्हती. सैन्याची नीट व्यवस्था लावल्याशिवाय युद्ध करणं अयोग्य होतं. त्यामुळे जन्नोपंतांना तीन लाख रुपये खंडणी देऊन तिनं सुलतानाशी तह केला. तरीही सुलतानाचे सैनिक केळदीकडे आगेकूच करीतच होते.

त्यामुळं चेन्नम्मानं प्रजेला एकत्र बोलावून आवाहन केलं. ती म्हणाली, " माझ्या प्रिय कन्नड वीरांनो, आपण महान योद्धे आहात. आज केळदीचं भाग्य सर्वस्वी तुमच्या हाती आहे. युद्धातील विजय तुम्हाला राज्याची, तर मृत्यू स्वर्गाची प्राप्ती करून देईल. जिंकलात तर योग्य मानचिन्हं देऊन आपला गौरव केला जाईल." याप्रमाणे तिनं आपल्या माणसांना अतिशय कळकळीनं आणि जिव्हाळयानं आवाहन केलं. राजगृहातील स्वतःच्या कोषातून तिनं आपली रत्नं आणि सुवर्ण त्यांना वाटली. तिच्या वीरश्रीयुक्त भाषणानं आणि औदार्यानं सारेजण भारावून गेले. सर्व सैनिकांनी युद्धाकरिता कंबर कसली.

इकडे राणीच्या भेटीनंतर जन्नोपंताचं अभद्र पाऊल भरमेमावुताकडे वळलं. कानगोष्टी झाल्या.

कट शिजला. अन् होऊ नये ते घडलं. भरमेमावुतानं सोमेश्वराचा निर्घृण खून केला.

चेन्नम्माला ही हृदयविदारक बातमी कळली. तिला भयंकर धक्का बसला. हृदय दुःखानं भरून आलं. पण निष्क्रियपणे दुःखात बुडून जाणारी ती स्त्री नव्हती. होय, तिचा पती देवाघरी गेला होता ! पण तो नैसर्गिक मृत्यू नव्हता. तो खून होता. त्या खूनाचा बदला घेण्याचा तिनं निर्धार केला. तिच्यात दुर्गेचा संचार झाला.

विजापूरच्या सैन्यानं बिदनूरच्या किल्ल्याला वेढा घातला. भरमेमावुताला वश झालेल्या माणसांनी सुलतानाच्या सैनिकांना सर्व मदत केली.

शत्रूचं सैन्य फार मोठं होतं. सिद्धप्पशेट्टी आणि राज्यातील इतर अधिकारी यांनी राणीला सांगितलं, "आपण कितीही शौर्यानं लढलो तरी विजयाबाबत शंकाच आहे." तात्पुरते बिदनूर सोडून जाण्याचा त्यांनी तिला सल्ला दिला.

बिदनूर सोडण्याचा हा विचारच तिला विषासमान होता. परंतु दुसरा कोणताही उपाय

उरला नव्हता. राज्याचं सिंहासन, संपत्ती, खजिना आणि इतर साऱ्या मौल्यवान वस्तू भुवनगिरी येथे हलविण्यात आल्या.

सुलतानाच्या सैन्यानं किल्ल्याचा दरवाजा फोडून राजवाड्यात प्रवेश केला. पण त्यांना राणी कुठं गवसलीच नाही. खजिना रिकामा सापडल्यानं ते निराश झाले, संतापलेही. त्यांच्या अंगाची लाही झाली. भुवनगिरीचा किल्ला घनदाट अरण्याच्या आवरणाखाली होता. तिथं सैन्य, दरबारी अधिकारी, चेन्नम्मा राणी सारे अगदी सुरक्षित होते.

**'मी चुकलो–मी पापी'**

मुख्यमंत्री तिमण्णा राणीशी मतभेद झाल्यानंतर बिदनूर सोडून गेला होता. त्याला बिदनूर पडल्याची वार्ता कळताच अतिशय दुःख झालं. तो मनातून देशभक्त होता. दत्तकाच्या प्रश्नावरून राणीशी मतभेद झाला तरी त्याची निष्ठा कायम होती. शत्रूनं बिदनूर घेतल्यानं तो संतप्त झाला आणि तडक भुवनगिरीला गेला. विनम्र भावानं तो राणीला भेटला आणि म्हणाला, " राणीसाहेब,



" आवश्यक असेल त्यांना संरक्षण



देणं, हा माझा धर्म आहे.”

मी महान अपराधी आहे. सोमेश्वरनायकाच्या मृत्यूनंतर मी बिदनूर सोडायला नको होतं. माझ्या हातून फार भयंकर पाप घडलं. जिथं मी जन्मलो आणि वाढलो ते बिदनूर आज परक्यांच्या हाती गेल्यामुळं मी अत्यंत व्यथित आहे. पुन्हा एकदा या संकटकाळी आपल्या सेवेची संधी कृपया मला द्या."

राणी उदार होती. ती उत्तरली, "तिम्मण्णा, तुमच्या शब्दांमधून व वागण्यामधून तुमची राजनिष्ठा पुरेशा प्रमाणात प्रकट झाली आहे. केळदीच्या रक्षणासाठी, बिदनूरच्या पुन:प्राप्तीसाठी तुमच्यासारख्या सर्वांची मदत आणि परमेश्वराचे आशीर्वाद यांची आज नितांत गरज आहे. तुम्ही अनुभवी मुत्सद्दी आहात. तुमचे साह्य आम्हाला अवश्य हवे. शिवप्पनायकापासून तुम्ही सेवा रूजू केली. आपली मर्जी असल्यास मुख्यमंत्र्याचे पद आपल्यासाठीच सिद्ध आहे."

राणीनं सम्मानपूर्वक मुख्यमंत्र्याचे अधिकार तिम्मण्णाला बहाल केले. केळदीच्या राजांकडून ज्यांना फायदे मिळाले होते, विशेषत: चेन्नम्मानं

ज्यांना साह्य केलं होतं, ते सारे हजारोंच्या संख्येनं भुवनगिरीला आले. केळदीसाठी आणि राणीसाठी आपलं सर्वस्व अर्पण करायला ते तयार होते.

## प्रजामाता चेन्नम्मा

तिम्मण्णानं केळदीच्या सर्व भागांतून कुशल सेनाधिकारी आणि शूर सैनिक एकत्र केले आणि पुन्हा सैन्याची उभारणी केली. त्यानं बिदनूरवर चाल केली. इकडे विजापूरचं सैन्य विजयोन्मादानं धुंद होऊन भुवनगिरी सर करण्याच्या हेतूनं भुवनगिरीकडे येत होतं. पण दाट जंगलातील खिंडीमध्ये असतानाच वीर कन्नड योद्धयांच्या हाती ते सापडलं. केळदीच्या सैन्याला तो प्रदेश पूर्ण परिचयाचा होता. विजापूरी सैन्याचा पराभव करून तिम्मण्णा बिदनूरला आला. केळदीच्या नागरिकांना अतिशय आनंद झाला. विजयी सैन्याच्या स्वागता-साठी त्यांनी सारी दारं सताड उघडी केली.

केळदीच्या आबालवृद्ध जनतेनं चेन्नम्माचा आपली राज्ञी म्हणून स्वीकार केला. १६७१ मध्ये

भुवनगिरीच्या किल्ल्यात तिच्या मस्तकावर राजमुकुट चढविण्यात आला.

चेन्नम्मानं सारी शासनसूत्रं आपल्या हाती घेतली. ज्यांनी बिदनूरच्या युद्धात तिला मदत केली होती त्यांना संपत्ती, सोनं, जमीन आणि मानाच्या जागा देऊन तिनं त्यांचा यथायोग्य सत्कार केला. अराजकता आणि अनागोंदी कारभार यामुळे बिघडलेली राज्याची घडी नीट बसविली आणि राज्यात सुखशांती निर्माण केली. शिवप्पनायकानं आखून दिलेली शासनपद्धती तिनं पुन्हा रूढ केली. रामेश्वर, अघोरेश्वर नि देवी मूकांबिका या देवतांच्या देवळांची व त्यांच्या पूजेअर्चेची विशेष गौरवपूर्ण थाटाची व्यवस्था तिनं केली. आपल्यावरील सारी संकटं त्यांच्या कृपेमुळेच दूर झाली अशी तिची श्रद्धा होती.

चेन्नम्मानं भरमेमावुत अन् जन्नोपंत या दोघांनाही अटक केली. तिच्या प्रिय पतीच्या निधनाला हेच जबाबदार होते. त्या दोघांनाही तिनं देहान्ताची शिक्षा दिली. ज्यांनी केळदीच्या सुखाला

सुरुंग लावला, गुप्त कारस्थानं करून राज्य उलथ-वण्याचा प्रयत्न केला त्या सर्वांना तिनं शिक्षा दिली आणि हद्दपार केलं. आता राणी चेन्नम्मा आपल्या राज्याचा कारभार समर्थपणे पाहू लागली. सज्जनांसाठी ती साक्षात् देवता होती आणि दुष्टांकरिता मूर्तिमंत विनाशिनी होती! तिनं 'अग्रहाराची' निर्मिती केली. 'अग्रहारा' म्हणजे संपूर्ण रस्त्याच्या दोन्ही बाजूंना घरांची व्यवस्था. राज्यातील विविध विषयातील व्यासंगी विद्वानांना तिनं या घरांमध्ये येऊन राहण्याची विनंती केली व त्याला सोमशेखरपूर असं नाव दिलं. दिवसरात्र ती आपल्या राज्याच्या कल्याणाकरिता झटत होती.

आपल्या विश्वस्तांच्या अनुमतीनं तिनं बसप्पनायकाला दत्तक घेतलं. सैन्यात वाढ करून तिनं राज्याच्या सीमा सुरक्षित केल्या. राज्यकार-भाराची कामं आटोपली म्हणजे ती आपला फावला वेळ ध्यानधारणा आणि दानधर्म यात घालवी. मठांना आणि धार्मिक संस्थांना चेन्नम्मानं अनेक जमिनी दान दिल्या. राणी सर्व धर्मांचा आदर करी आणि प्रत्येक जण तिलाही मान देई.

**राज्यसुरक्षा**

फार वर्षापूर्वी म्हैसूर नि केळदी यांच्या राजांमध्ये दोन-तीनदा युद्धं झाली होती. त्यात म्हैसूरच्या राजांनाच पराभव पत्करावा लागला होता. केळदी राज्याला विशाल समुद्रकिनारा लाभलेला असल्यामुळं डच व फ्रेंच या विदेशी प्रवाशांकडून त्याला भरपूर कमाई होई व अनेक फायदे मिळत.

चेन्नम्माच्या कारकीर्दीत म्हैसूरला चिक्क-देवराय वडेयर हा राज्य करीत होता. एकदा केळदीच्या राजघराण्याशी संबंधित असलेल्या अंधक व्यंकटनायक या व्यक्तीनं म्हैसूरच्या राजाला पत्र लिहिलं, "महाराज, केळदीचं राज्य वस्तुत: मला मिळायला हवं. पण चेन्नम्मानं मध्ये येऊन माझा हक्क हिरावून घेतला आहे. तुम्ही जर चेन्नम्माशी युद्ध करून मला माझं राज्य मिळवून दिलं तर मी तुम्हाला अर्धं राज्य देईन व इतर साहाय्य करीन."

चिक्कदेवरायला हे पत्र वाचून खूप आनंद झाला. एका अबलेच्या हाती असलेलं राज्य मिळ-

वायला कितीसा वेळ लागणार ! आपण ते सहज मिळवू, असं त्याला वाटलं. त्यानं युद्धाची तयारी सुरू केली. आपण विजयी झालो की केळदीचं अर्धं राज्य नि परदेशी समुद्रप्रवाशांकडून होणारा लाभ आपल्याला मिळेल या स्वप्नात तो धुंद झाला.

म्हैसूरच्या राजानं युद्ध पुकारलं म्हणून चेन्नम्मा बिलकुल घाबरली नाही. ती शांत व निर्भय होती. आपला सेनापती भद्रप्पनायक याच्या आधिपत्याखाली तिनं मोठ्या सैन्याची रवानगी शत्रूंविरुद्ध केली. म्हैसूरच्या राजाप्रमाणे सोदे, सिरसी नि बनवासी येथील सरदारांनीसुद्धा केळदीविरुद्ध युद्ध पुकारलं. परंतु चेन्नम्मानं मोठ्या कौशल्यानं सर्व शत्रूंचा पराभव केला.

म्हैसूरच्या राजाकडील अनेक अधिकाऱ्यांना तिनं अटक केली. परंतु त्यांचा योग्य तो मान राखण्याचं सौजन्य तिनं दाखविलं. तिनं त्यांची मुक्तताही केली. राणीच्या या औदार्यामुळे चिक्क-देवरायच्या मनात तिच्याविषयी आदर निर्माण

झाला. परिणामत: म्हैसूर व केळदी यांच्या राज्यकर्त्यांनी परस्पर मैत्रीच्या करारावर स्वाक्षरी केली.

चेन्नम्माला इतरही अंतर्गत शत्रू होते. केळदीच्या सिंहासनावर नजर ठेवून असलेल्या राजद्रोह्यांना तिनं तडीपार केलं होतं. अन्य राजांच्या मदतीनं त्यांनीही आता राणीविरुद्ध उठाव केला. परंतु राणीनं पूर्ण सामर्थ्यानिशी त्यांचा पाडाव केला.

या वेळपर्यंत चेन्नम्माचा काळ राज्याची घडी नीट बसविण्यात गेला. आता आपला दत्तक-पुत्र बसप्पनायक हाच भावी राजा आहे, हे ओळखून त्याच्या शिक्षणाकडे व राज्यकारभाराच्या शिकवणीकडे ती स्वत: लक्ष देऊ लागली.

प्रात:काळी स्नान, प्रार्थना वगैरे आटोपून ती राजदरबारात जाई. तिथे दुपारपर्यंत थांबून नागरिकांच्या अडचणी, प्रजेची सुखदु:खं लक्षपूर्वक जाणून घेई. सहानुभूतीपूर्वक त्यांना मदत करी. राज्यकारभार आणि प्रशासन यासंबंधीच्या अनेक

प्रश्नावर वसप्पनायक, मंत्रिमंडळाचे सभासद आणि इतर अधिकारी यांच्याशी चर्चा करून निर्णय देई. माध्याह्नीच्या प्रार्थनेनंतर व पूजेनंतर ती एक तास दानधर्मात वेचे. या काळात साधू, संन्यासी, धर्मोपदेशक, गरीब आणि गरजवंत यांना मदत मिळे.

## छत्रपतींचा पुत्र

एकदा माध्याह्नी चेन्नम्माराणी दानधर्म करीत असताना चार संन्यासी तिथे आले. ते अतिशय तेज:पुंज व प्रभावी दिसत होते. इतर सर्वांचं दानग्रहण संपेपर्यंत ते बाजूला थांबले. व सर्वात शेवटी राणीच्या समोर गेले. चेन्नम्मानं त्यांच्याकडे क्षणभर पाहिलं. त्यांचं विलक्षण तेज पाहून हे सामान्य संन्यासी नाहीत हे तिनं तेव्हाच हेरलं. त्यांच्या म्होरक्यानं चेन्नम्माला नमस्कार केला तेव्हा ती मैत्रीच्या स्वरात म्हणाली, "महाराज, आपण थोर देवपुरुष आहात. तुम्ही मला आशीर्वाद द्यायला हवा; प्रणाम नाही. आपण कुठून आलात ? मी आपली काय सेवा करू ?" संन्यासी अदबीनं थोडा पुढे सरसावला

नि म्हणाला, "महाराणी, मी साधूसंन्यासी नाही." राणीला आश्चर्य वाटलं. तिनं विचारलं, "मग आपण कोण? या वेषात का आलात?"

"राणीसाहेब, मी राजाराम आहे, छत्रपती शिवाजी महाराजांचा मुलगा." राजारामानं हळूच सांगितलं. शिवाजीचं नाव ऐकताच चेन्नम्मा थरारली. आश्चर्य, आनंद, श्रद्धा सारे भाव तिच्या नजरेत प्रतिबिंबित झाले. ती म्हणाली, "ज्यानं हिंदुत्वाच्या रक्षणासाठी दक्षिणेत लढा देऊन हिंदवी स्वराज्याची स्थापना केली, त्या शिवाजीचा तू मुलगा आहेस? अरे देवाऽऽ! कसला कठीण काळ तुझ्यावर ओढवला आहे? कृपया खाली बैस आणि सांग राजपुत्रा, मी तुझ्यासाठी काय करू?" राजाराम व्यथित अंतःकरणानं म्हणाला, "आई, औरंगजेबानं संभाजीची क्रूर हत्या केली आणि तो आता माझ्या पाठीस लागला आहे. माझं राज्य नष्ट करून मला मारण्यासाठी त्यानं मोठं सैन्य धाडलं आहे. माझ्या राज्यातले काही किल्लेही त्यानं काबीज केले आहेत. जर मी सापडलो तर सारा महाराष्ट्र आपल्याला गिळंकृत करता येईल असं औरंगजेबाला वाटतं. विविध

वेषांतरं करून त्याला हुलकावण्या देत मी इथपर्यंत आलो. कितीतरी हिंदू राजांना मी आश्रय मागितला. पण व्यर्थ !" "काय, हिंदू राजांनी तुला आश्रय द्यायला नकार दिला ?" "होय. औरंगजेबाच्या रोषाला घाबरून त्यांनी नकार दिला." "खरोखर, अगदी अविश्वसनीय आहे. हिंदुत्वाच्या रक्षणासाठी लढा देणाऱ्या शिवरायांच्या पुत्राला आश्रय देणं हे वास्तविक आम्हा प्रत्येकाचं कर्तव्य आहे."

"आई, औरंगजेबाचं शत्रुत्व घेणं ही सामान्य गोष्ट नाही."

राजारामाला आश्वस्त करीत ती म्हणाली, "राजपुत्रा, केळदीच्या राजवाड्यात मदतीच्या वा आश्रयाच्या अपेक्षेनं आलेला कुणीही आजपर्यंत निराश होऊन परत गेला नाही. आज राज्यावर एक स्त्री आहे म्हणून काय बिघडलं ? मी काही असहाय अबला नाही; वीर-भू कन्नडकन्या आहे. आवश्यक असेल त्याला संरक्षण देणं हा माझा धर्म आहे. कृपया आमच्या अतिथिगृहात चला आणि विश्रांती घ्या."

"महाराणी, मला आश्रय देण्यापूर्वी आपल्या मंत्र्यांचा कृपया सल्ला घ्या. हे काही एखाद्याला निव्वळ खाऊपिऊ घालणं नव्हे. हा तुमच्या राज्याच्या अस्तित्वाचा अथवा नास्तित्वाचा प्रश्न आहे."

चेन्नम्मानं प्रत्येक शब्दावर आघात करीत म्हटलं, "युवराज, कन्नड लोक दिलेला शब्द फिरवत नसतात. आपल्या आश्रयाला आलेल्यांना मदत न करण्याइतके ते भित्रे नाहीत."

"मला ते ठाऊक आहे, राणीसाहेब. आपल्या शौर्याची आणि औदार्याची कीर्ती ऐकल्यामुळेच मी इथं येण्याचं धाडस केलं. आपल्या मंत्र्यांना मान्य असेल तर कृपया मला अल्पावधीसाठी आश्रय द्या. आणि जिंजीच्या किल्ल्यावर पोहोचायला मदत करा. आपल्या कृपेचा मला कधीही विसर पडणार नाही. जर हे शक्य नसेल तर उद्याच मी ही जागा सोडून जाईन."

"युवराज, आज संध्याकाळी मी राजदरबार बोलावून या प्रश्नावर चर्चा करीन. काहीही झालं तरी मागतील त्यांना मी आश्रय देणारच. राज-

रीतीचं पालन करणं आणि आपल्याला जिंजीला सुरक्षितपणे पोहोचविणं ही आता माझी जबाबदारी आहे."

"केळदीचं राजघराणं खरोखरीच मोठं उदार आहे! मोठमोठ्या बलाढ्य राजांनीही जिथं मला आश्रय नाकारला तिथं या संकटांशी सामना करण्याचं धैर्य एका स्त्रीनं दाखवावं ही नवल वाटावी अशीच घटना आहे. महाराणी, मी अतिशय कृतज्ञ आहे." इतकं बोलून राजारामानं राणीला अभिवादन केलं आणि तो अतिथिगृहाकडे निघून गेला.

सायंकाळी दरबार भरला. राणीनं घडलेली सर्व हकीकत त्यांना सांगितली. हे ऐकताच पंतप्रधान तिम्मण्णनायक यानं इशारा दिला, राणीसाहेब, औरंगजेब राजारामाच्या मागावर आहे. त्यानं रायगड, पन्हाळगड आणि इतर किल्ले सर केले आहेत. अशा वेळी राजाराम केळदीत असल्याचं त्याला जर कळलं तर तो आपल्या राज्याचा नक्कीच पूर्ण विनाश ठरेल."

सिद्धप्पशेट्टीनंही आपल्या मुलीला स्पष्ट शब्दात सांगितलं, "आपले महामंत्री म्हणतात ते अगदी खरं आहे. आतापर्यंत आपण सभोवतालच्या शत्रूंशी लढलो. नुकतीच कुठे शांतता आणि सुव्यवस्था राज्यात परतू लागली आहे. आता औरंगजेबाशी युद्ध करणं हे आपल्या शक्तीबाहेरचं आहे."

सेनापती भद्रप्पा आणि मंत्री नरसप्पैय्या हे देखील याच मताचे होते.

सर्वांची मतं ऐकून चेन्नम्मा म्हणाली, "महाभागांनो, आपण म्हणता ते सारं खरं आहे. यासंबंधी मीही आतापर्यंत खोलवर विचार केला. आश्रयाला आलेल्यांना संरक्षण देण्याची परंपरा आजपर्यंत केळदीच्या राजांनी पाळली. ती पुढेही कायम ठेवणं हे माझं कर्तव्य आहे. श्रीशिवाजी महाराज हिंदुत्वाच्या रक्षणासाठी आजीवन झुंजले. त्यांच्या मुलानं जर मदत मागितली तर ती कशी नाकारता येईल ? राज्याची सुरक्षितता ही परमेश्वराच्या हातातली गोष्ट आहे."

"मला मान्य आहे, आई." बसप्पनायक

म्हणाला, "तू म्हणतेस ते अगदी खरं आहे. संरक्षण देणं हे ठार मारण्यापेक्षा अधिक उदात्त आहे, अशी तुझी नेहमीची शिकवण आहे. परमेश्वराची कृपा आणि आपल्या वीरांचे शौर्य याच्याविरुद्ध औरंगजेब काय करू शकेल?"

दरबारातले सर्व तरुण राजारामाला संरक्षण देण्याच्या विचाराचे होते. सर्व मंत्र्यांनी अपरिहार्यपणे त्यांना संमती दिली.

**मोगल सैन्याची काळी सावली**

चेन्नम्मानं परमेश्वरावर हवाला टाकला आणि राजारामाला संरक्षण दिलं. केळदीत अपेक्षित युद्धाची तयारी सुरू झाली. इकडे औरंगजेबानं आपला मुलगा अजमत याला प्रचंड सैन्यानिशी केळदीवर रवाना केलं. परंतु या दरम्यान राजाराम सुखरूपपणे जिंजीला पोचला होता.

धूर्त औरंगजेबानं इकडे केळदीवर सैन्य धाडलं आणि ते तिथं पोचण्यापूर्वीच मौल्यवान रत्नादी वस्तूंचा नजराणा व पत्र घेऊन एक दूतही चेन्नम्माकडे पाठविला.

औरंगजेबानं आपल्या पत्रात लिहिलं होतं,

" महाराज्ञी, तुम्हाआम्हात मुळीही शत्रुत्व नाही. परंतु मी असं ऐकलं आहे की माझा महान शत्रू राजाराम आपल्या संरक्षणाखाली आहे. कृपया, त्याला ताबडतोब माझ्या स्वाधीन करण्यात यावं. त्यानंतर आपल्या दोन राज्यांमध्ये मैत्रीचा करार होऊ शकेल. अन्यथा मोगल सेनेला तोंड देणं आपणास भाग पडेल."

चाणाक्ष राणीनं आपल्या मंत्र्यांशी विचार-विनिमय करून औरंगजेबाला पुढीलप्रमाणे उत्तर पाठविलं, " आपलं पत्र साभार पोचलं. केळदीची जनता मोगलांशी मैत्री जोडायला केव्हाही तयार आहे परंतु आपण आपल्या मैत्रीचा जो मोबदला मागितला आहे, तो देता येणं शक्य नाही. राजाराम केळदीच्या राज्यात नाही. तो या राज्यात येऊन गेला ही गोष्ट मात्र उघड आहे."

राणीचं पत्र औरंगजेबाला पोहोचेपर्यंत मोगलांची विराट सेना केळदीजवळ येऊन ठेपली. राणी युद्धासाठी पूर्णपणे तयार होती. केळदीचे शूर सैनिक मोगलांच्या वाटेवर सर्वसिद्ध होऊन प्रतीक्षाच करीत होते. ती वाट घनदाट जंगलातून

जाणारी होती आणि तशात पावसाळाही सुरू झाला होता. उत्तरेतील कोरड्या हवामानात रूळलेल्या मोगल सैनिकांना मलनाड प्रदेशातील त्या मुसळधार पावसात आणि घनदाट जंगलातून आगेकूच करणं अतिशय कठिण जात होतं. परंतु औरंगजेबाची आज्ञा म्हणून ते मोठ्या कष्टानं मार्गक्रमण करीत होते.

कन्नड वीर घनदाट अरण्यात दबा धरून बसले आणि मोगल सैन्याची त्यांनी अक्षरशः कत्तल सुरू केली. हे पाहून राजपुत्र अजमत याला धक्काच बसला. ज्यानं पूर्वी मोठमोठ्या सरदारांचा पराभव केला होता त्याला आज एका स्त्रीनं पराभूत केलं होत. असा पराभव पत्करून परतल्यास त्याचा शिरच्छेद झाला असता. केवळ या कल्पनेनंच त्याला दरदरून घाम सुटला.

परंतु त्याच्या सैनिकांमध्ये आता पुढे जाऊन घनघोर युद्ध करण्याचं व केळदीचा किल्ला धुळीला मिळविण्याचं मनोधैर्यच उरलं नव्हतं. बहुतांश सैन्य नष्ट झालं होतं. केळदीच्या सैनिकांनी मोगलांचे कित्येक सरदार, अनेक घोडे आणि बरंचसं युद्ध-

साहित्य आपल्या ताब्यात घेतलं होतं. त्यामुळं युद्ध अतिशय मंदगतीनं आणि अनिश्चित दिशेनं सुरू होतं. अजमत अगदी त्रासून गेला होता.

एवढयात त्याला औरंगजेबाकडून एक खलिता मिळाला, " राजाराम आता जिंजीच्या किल्ल्यावरून प्रशासन करीत आहे. तेव्हा तावड-तोव केळदी सोडा आणि जिंजीला जा."

अजमतला हेच हव होतं. त्यानं चेन्नम्माशी तह केला. चेन्नम्मालाही त्यामुळं आनंद झाला. तिनं मोगल सेनाधिकाऱ्यांना उदारपणाची वागणूक दिली आणि कराराप्रमाणं त्या सर्वांची सुटकाही केली. औरंगजेबानं चेन्नम्माला सार्वभौम राज्ञी म्हणून मान्यता दिली.

राणीनं आपल्या सैनिकांना आणि अधि-काऱ्यांना योग्य बक्षीसं दिली. अशा रीतीनं औरं-जेबासारख्या बलाढ्य राजाशी झालेल्या युद्धात निर्णायक विजय प्राप्त करण्याचा वहुमान वीर कन्नडकन्या महाराणी चेन्नम्मा हिनं मिळवला.

राजारामानंही जिंजीहून राणीला कृतज्ञतेचं पत्र लिहिलं. त्यात म्हटलं होतं, " जेव्हा मोठ-

मोठ्या राजांनीही मला मदत नाकारली तेव्हा आपण मला निर्भयपणे आश्रय दिला आणि हिंदुत्वाच्या रक्षणाला मदत केली. आपलं हे शौर्य आणि औदार्य मी कधीही विसरू शकणार नाही. आई भवानी आपणास उदंड आयुष्य आणि सुख देवो ! आपलं राज्य सर्वसुखांचं धाम व्हावं अशी मी परमेश्वराजवळ प्रार्थना करतो."

आपल्यावर आलेलं पर्वतप्राय संकट धुक्यासारखं वितळून गेलं, असं राणीला वाटलं.

**कुशल प्रशासक**

आपल्या अधिपत्याखाली असलेल्या विशाल समुद्रकिनाऱ्यावर व्यापार करण्यासाठी अरब आणि पोर्तुगीज यांच्याशी तिनं कुशलतेनं करार केले. राज्यासाठी आवश्यक असणाऱ्या विविध मालाची आयात करणं सोयीचं आणि फायद्याचंही होतं. राज्यरक्षणासाठी अतिशय आवश्यक असणारे घोडे ती अरबांकडून घेई आणि अरब व पोर्तुगीज तिच्याकडून मलनाड प्रदेशात होणारा तांदुळ व काळी मिरी विकत घेत. केळदीच्या कोषात यामुळं बरीच भर पडली.

एव्हाना तिचा दत्तकपुत्र वसप्पनायक वयात आला होता. चेन्नम्माच्या प्रशिक्षणानं तो आता राज्यकारभारात निपुण झाला होता. तो आतिथ्यशील, सद्‌गुणी आणि शूर होता. तो राज्यशासन व्यवस्थित चालवील, याचा राणीला आत्मविश्वास होता. प्रशासनातील बव्हंश कार्यभार आता तिनं त्याच्यावर सोपवला.

राणीचा बहुतेक वेळ आता इतरांच्या सेवेत जाई. तिनं तीर्थयात्रा करून इक्केरीचं अघोरेश्वर मंदिर, कोल्लूरचं मूकांबिका मंदिर आणि श्रृंगेरीचं शारदंबा मंदिर यांना भेटी दिल्या. या मंदिरांमधील पूजाअर्चा वर्षभर सुरू राहावी यासाठी त्या देवस्थानांना तिनं जमिनी दिल्या.

मधल्या काळात वसवपट्टणजवळील हुलीकेरे हे ठिकाण तिनं जिकलं; तिथला पडका किल्ला पुन्हा बांधून काढला. बसप्पनायक सिंहासनावर आल्यानंतर आपल्या आईच्या गौरवार्थ त्यानं त्याचं 'चेन्नगिरी' असं नव्यानं नामकरण केलं.

राणीनं एक सुंदर रथ करवून तो बिदनूरजवळ असलेल्या वेणीपुर येथील नीलकंठेश्वराला

अर्पण केला. प्रतिवर्षी नीलकंठेश्वराची यात्रा भरावी, यासाठीही तिनं व्यवस्था केली. केळदीचा रामेश्वर आणि वीरभद्रेश्वर ही तिची कुलदैवतं होती. त्यांना तसंच कोल्लूरच्या मूकांबिका देवस्थानालाही तिनं जमीन आणि सुवर्ण यांच्या रूपात उदार देणग्या दिल्या. मंदिरातील पूजा सुव्यवस्थितपणे चालाव्या, हाच त्यामागे उद्देश होता. केळदीच्या वीरभद्रेश्वर-मंदिराचा कळस पुन्हा बांधून त्यावर तिनं ध्वजस्तंभ उभारला. काशी, रामेश्वर, श्रीशैल आणि तिरुपतीच्या देवळांनाही तिनं देणग्या दिल्या. तसंच वीरशैव सन्याशांसाठी मठ व शैव आणि वैष्णव यांच्याकरिता 'अग्रहारां'ची बांधणी केली.

१६७१ ते १६९६ पर्यंत अत्यंत समर्थपणानं व उमदेपणानं तिनं केळदीवर राज्य केलं. तिचं जीवन कीर्ती आणि भव्योदात्तता यांनी ओतप्रोत होतं. ती पुण्यशील आणि पापभीरू होती.

मृत्युशय्येवर असताना त्या पुण्यशील राणीनं आपल्या मुलाला बोलावून सांगितलं, " बाळा बसप्पनायका, चौडप्पनायकानं स्थापन केलेलं हे राज्य रक्षिण्याचं आणि वाढविण्याचं काम आता

तुझं आहे. आपल्या संतपुरुषांनी सांगितल्याप्रमाणं आपली वागणूक ठेव. तुझं बोलणं मौक्तिकमाळे-सारखं सुंदर असू दे. सत्य, दयाळूपणा आणि पुण्यशीलता या मूल्यांसाठीच जग आणि आपल्या हातून कोणत्याही प्रकारचं पाप घडू देऊ नकोस. वाईट व्यसनांमध्ये वेळ दवडू नकोस. चांगल्या कामांमध्ये आपला वेळ खर्ची घाल. आपल्या पुत्रां-प्रमाणं प्रजेची काळजी घे. तिच्या सुखदु:खात सहभागी हो. चांगलं नाव मिळव आणि राज्याची व राजघराण्याची कीर्ती वाढव.

केळदी हे सर्व सुखांचं धाम होऊ दे. लोक समाधानी आणि आनंदी असू दे. परमेश्वराची तुझ्यावर कृपा असो !"

हिंदूंना पवित्र असलेल्या श्रावण महिन्यात या पुण्यवान आणि सद्‌गुणी स्त्रीनं, शूर आणि बुद्धिवान राणीनं अखेरचा श्वास घेतला. बसप्पनायक आणि केळदीची जनता दु:खात बुडून गेली. बिदनूरमध्ये कोप्पळंच्या आश्रमात तिच्यावर अंत्यसंस्कार झाला.

### स्फूर्तीचा झरा

सोमेश्वरनायकाच्या मूर्खपणामुळं जेव्हा केळ-



" आपल्या मुलांप्रमाणे प्रजेची काळजी घे."

दीचं राज्य संकटात सापडलं आणि शत्रूंकडून घेरलं गेलं तेव्हा राज्याचं आणि प्रजेचं हित लक्षात घेऊन चेन्नम्मा अतिशय धैर्यानं आणि सूज्ञ-पणानं वागली. सर्व शत्रूंचा तिनं निःपात केला. इतर सर्व राजांनी औरंगजेबाला भिऊन शिवा-जीच्या पुत्राला आश्रय नाकारला परंतु या कन्नड वीरांगनेनं त्याला मदत केली. जितकी शूर तित-कीच ती सूज्ञ आणि समर्थ राज्ञी होती. तिनं केळदीमध्ये शांतीचं युग प्रस्थापित केलं. शत्रूंचं भय, चोरांचा त्रास आणि अधिकाऱ्यांची दडपशाही यापासून तिच्या राज्यातील लोकजीवन मुक्त होतं. तिनं गरिबांना मदत दिली आणि सर्व धर्मांचा आदर राखला.

भारताच्या आणि कर्नाटकाच्या इतिहासात केळदीच्या या शूर राणीचं नाव सोन्याच्या अक्ष-रांनी लिहिलं आहे. धैर्य आणि उमदेपणा यांचं कौतुक असणाऱ्या आणि स्वातंत्र्यावर प्रेम कर-णाऱ्या लोकांना चेन्नम्मा राणीचं जीवन हे एक अखंड स्फूर्तीस्थान आहे.

म. ग्रं. सं. ठाणे
BVBK-0401323